# जाहीर सुचना

## जिल्हाधिकारी अकोला, यांचेकडून

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६ दिनांक १५ जुन, २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ ( सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) ( यापूढे सदर अधिनियम म्हणून संबोधित केला) चे कलम १० (१) अन्वये मुख्याधिकारी नगरपरिषद **अकोट, बाळापुर, मुर्तिजापुर, तेल्हारा व पातुर** यांनी प्रारुप प्रभाग रचनेच्या अनुसूचित दर्शविल्याप्रमाणे **अकोट, बाळापुर, मुर्तिजापुर, तेल्हारा व पातुर** नगरपरिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागाची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

सदर अधिनियमाच्या कलम १०, पोटकलम (१) च्या परंतुकाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा याद्वारे **अकोट, बाळापुर, मुर्तिजापुर, तेल्हारा व पातुर** नगरपरिषद क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रारुप प्रभाग रचनेचा मसूदा तारीख **५ जुलै २०१६** नंतर जिल्हाधिकारी अकोला विचारात घेतील.

मसुद्यास ज्या लोकांच्या काही हरकत असतील त्यांनी त्या हरकती सकारण जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे **दिनांक १४ जुलै २०१६** रोजी किंवा तत्पुर्वी लेखी सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती जिल्हाधिकारी विचारात घेणार नाहीत.

नगर परिषदेच्या क्षेत्राच्या प्रभागांची सिमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद प्रशासन विभाग, संबंधीत तहसिल कार्यालय व संबंधीत नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध राहतील.

**जिल्हाधिकारी, अकोला**

**स्थळ — अकोला**

**दिनांक — ०५ जुलै २०१६**